Pimpri Chinchwad Education Trust's
Pimpri Chinchwad College of Engineering
( An ISO 9001:2015 Certified Institute )
Sector No.26, Pradhikaran, Nigdi, Pune 411 044
Tel.:020-27653168/27653166 Website :www.pccoepune.com

Record No.: ADMN-STUD-R-07-SCH
Rev.00 | Date: 15/09/2020
Page:01

## "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना" (EBC)- सुचना

Ref. No. : PCCOE/EBC/SN/2020-21/ 781 　　Date :- **05/01/2021**

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये (**CAP round** मधून) प्रवेश घेतलेल्या सर्व खुल्या गटातील प्रवेशित **(SEBC, EWS, OPEN)** या प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या **द्वितीय** ते **अंतिम** वर्ष अभियांत्रिकी/एमसीए/एमबीए विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी शिष्यवृत्तीचा अर्ज **https://mahadbtmahait.gov.in** या वेबसाईटवर भरून खालीलप्रमाणे कागदपत्रे जुळवून दिनांक **१५ जानेवारी, २०२१** पर्यंत कॉलेजच्या शिष्यवृत्ती विभागात जमा करावीत. ईबीसीसाठी उत्पन्न मर्यादा ८,००,०००/- आहे याची विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी. सर्व विदयार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरताना कागदपत्रांची मुळप्रत स्कॅन कॉपी अपलोड करावी.

विदयार्थी लॉगिनमधून अर्ज नुतनीकरण करताना लॉगिन केल्यानंतर Personal Information मध्ये विदयार्थ्याचे खाते ज्या बँकेत आहे त्याचा तपशिल (उदा. खाते कमांक व IFSC कोड) अपडेट करण्याची सुविधा शेवटी देण्यात आलेली आहे ही माहिती सर्व विदयार्थ्यांनी अचूकपणे नमूद करावी व फीज पेड ऑप्शन मध्ये अपडेट फी 0.00 करावी व फीजची पावती अपलोड करावी.

**"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना"** या योजनेचा **लाभ हा कुटुंबातील केवळ दोन** अपत्यांपर्यंत मर्यादित राहील. आपल्या माहितीसाठी शासन निर्णय संदर्भ खालीलप्रमाणे देत आहोत.

**संदर्भ ः शासन निर्णय क्र.** ः टीईएम२०१६/प्र.क्र.५५९/तांशि४, दिनांक २१ जून, २०१७.

सोबत जोडावयाची कागदपत्रे ः

१. प्रवेश प्रमाणपत्र Acknowledgement cum receipt of Confirmation of Admission through CAP.

२. तहसिलदार प्रमाणीत **उत्पन्नाचे मुळ** प्रमाणपत्र सन २०१९-२० जोडावे (**दोन्ही पालकांचे एकत्रित**) उत्पन्नाचा दाखला असावा, वडील हयात नसतील तर (***आईचा उत्पन्नाचा दाखला*** जोडावा व वडीलांचे मृत्यूचे प्रमाणपत्र जोडावे). **तसेच उत्पन्नाचा दाखला तहसिलदारांचाच ग्राहय धरला जाणार आहे,** तो नायब तहसिलदारांचा नसावा.

३. गॅप असल्यास गॅप ॲफीडेव्हीट. (मुळ प्रत)

४. मागील वर्षाची गुणपत्रिका FE,SE,TE. **मार्कशिट कॉलेजला आलेल्या आहेत व ओरिजिनल मार्कशिट फॉर्म भरताना अपलोड करावी.**

५. चालू शैक्षणिक वर्षास प्रवेश घेतल्याची फी पावती.

६. राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र.

७. रेशन कार्ड.

८. वेबसाईटवर दिलेले प्रतिज्ञापत्र पालकांच्या सहीनिशी जोडावे.

९. बँक खाते झेरॉक्स प्रत.

**विशेष बाब** ः १. अर्जदार विद्यार्थी पालकाच्या **पहिल्या दोन अपत्यांपैकी** (रेशनकार्ड नुसार) असावा.

२. वरील ईबीसी अर्ज भरणा-या विद्यार्थ्यांनी इतर कुठल्याही (दुसया) प्रकारची शिष्यवृत्ती घेतलेली नसावी.

Shri. Prashant S. Patil
Registrar

P.C. COLLEGE OF ENGINEERING NIGDI, PUNE-44.

CC to :

: 1. H.O.D., Mech/E&Tc/Comp/I.T./Civil/M.B.A./M.C.A./SE/TE/BE request to circulate in all classes & Display on notice board.
2. Boys and Girls Hostel
3. Prof. Ketan Desale - please upload on college website.
4. Office copy.